Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

Original Article

सण व समारंभ धार्मिक जीवनाचा अविभाज्य घटक: स्वरूप व विश्लेषण

डॉ. रायसिंग जालिंदर पाटील
संस्कार मंदिर संचालित, कला व वाणिज्य महाविद्यालय, वारजे माळवाडी पुणे
Email: rayajpatil@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180742
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 7
Pp. 199-202
July- 2026
Submitted: 16 June. 2026
Revised: 26 June. 2026
Accepted: 11 July. 2026
Published: 31 July. 2026

सारांश

या शोधनिबंधात महाराष्ट्रातील सांस्कृतिक व धार्मिक जीवनातील सण-समारंभांचे स्वरूप, महत्त्व आणि सामाजिक भूमिका यांचा अभ्यास करण्यात आला आहे. गुढीपाडवा, रामनवमी, हनुमान जयंती, अक्षय्य तृतीया, नागपंचमी, पोळा, रक्षाबंधन, गणेशोत्सव, वसंतपंचमी, दिवाळी आणि मकरसंक्रांत अशा विविध सणांच्या माध्यमातून धार्मिक श्रद्धा, निसर्गाशी असलेले नाते, सामाजिक एकोपा आणि सांस्कृतिक परंपरा स्पष्ट होतात. सणांच्या निमित्ताने पूजा, यात्रा, जत्रा, व्रत-वैकल्ये आणि सामूहिक उत्सव यांना ग्रामीण जीवनात विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. काळानुसार सणांच्या स्वरूपात आधुनिकतेचा प्रभाव पडला असला तरी पारंपरिक मूल्ये आणि सामाजिक-सांस्कृतिक परंपरा आजही टिकून आहेत. सण-समारंभ हे समाजातील स्नेह, एकता, परस्पर सहकार्य आणि सांस्कृतिक ऐक्य वाढविणारे महत्त्वाचे घटक असल्याचे निष्कर्षातून स्पष्ट होते.

मुख्य शब्द: *सण-समारंभ, महाराष्ट्राचे सांस्कृतिक जीवन, धार्मिक जीवन, लोकपरंपरा, धार्मिक उत्सव, ग्रामीण समाजजीवन, सांस्कृतिक ऐक्य, निसर्गाशी नाते, सामाजिक एकोपा, परंपरा आणि आधुनिकता.*

प्रस्तावना:

महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवनातील सण उत्सवाच्या माध्यमातून ईश्वराशी सृष्टीशी, आप्तस्वकीयांशी, प्रेरित आणि विनायकांशी मूल्यात्मक नाते रुजविण्याचा प्रयत्न केला जातो. समाजजीवनात ऋतूपरत्वे होणारे धार्मिक समारंभ, भोजनप्रसंग, मनोरंजनाचे व करमणुकीचे प्रसंग यामधून ही संस्कृती विस्तारत गेलेली दिसते. महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवनातील सण व समारंभ धार्मिक जीवनाचा अविभाज्य घटक मनाला जातो. महाराष्ट्रातील धार्मिक जीवन देवदेवतांशी निगडीत असल्याने धार्मिक ठिकाणी उत्सव व यात्रा भरत असतात. ऋतूचक्राशी, निसर्गाशी सण व समारंभाचे नाते जोडलेले असल्याने समाजामध्ये बदलत्या निसर्गाच्या पार्श्वभूमीवर सण समारंभाची, पूजा विधीची मांडणी समाजातील धार्मिक जीवनात होते. सहाजिकच यामधून सांस्कृतिक ऐक्यभाव समाजात निर्माण होतो. महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवनातील धार्मिक जीवनात विधी, यात्रा, जत्रा, धार्मिक उत्सव ग्रामीण जीवनात उत्साह निर्माण करणारे घटक मानले जातात. आषाढी एकादशी, रामनवमी, हनुमानजयंती, नागपंचमी, गोकुळाष्टमी, संक्रांत, शिवरात्री, गौरी पूजा, गुढीपाडवा, अक्षयतृतीया, नवरात्र, दसरा, दिवाळी, होळी, रंगपंचमी इत्यादी सण हे उत्साहाने साजरे करण्याची प्रथा आहे. सणांची सुरुवात चैत्र पाडवा (चैत्र प्रतिपदेपासून) होत होती. पुढे चक्र वर्षभर सुरू राहत असत. ग्रामीण जीवनात ग्रामदेवता, कुलदेवता तर बहुतेक गावात यात्रा किंवा उत्सव यासाठी राम, कृष्ण यांसारखा संस्कृत देवांच्या ऐवजी मरीआई, खंडोबा, म्हसोबा, बेताल, भैरोबा, तुकाई इ. प्रसिद्ध देवतांची पूजा-अर्चा, उत्सव यात्रा वर्षभर चालत असत. याशिवाय धार्मिक कार्याप्रसंगी नवस, अनुष्ठाने, व्रतवैकल्य परंपरेनुसार केले जातात.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. रायसिंग जालिंदर पाटील संस्कार मंदिर संचालित, कला व वाणिज्य महाविद्यालय, वारजे माळवाडी पुणे

How to cite this article:
पाटील रायसिंग जालिंदर. (2026). सण व समारंभ धार्मिक जीवनाचा अविभाज्य घटक: स्वरूप व विश्लेषण. Journal of Research and Development, 18(7), 199–202. https://doi.org/10.5281/zenodo.22026316

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.22026316
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

थोडक्यात वरील सर्व पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील सण समारंभ यांचे सांस्कृतिक जीवनातील स्थान स्पष्ट करण्याचा प्रयत्न *" सण व समारंभ धार्मिक जीवनाचा अविभाज्य घटक: स्वरूप व विश्लेषण"* या प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून केलेला आहे.

१.संशोधनाचे उद्देश :

१. महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवन स्पष्ट करणे.
२. महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवनात सण समारंभाचे महत्त्व अधोरेखित करणे.
३. महाराष्ट्रातील सण उत्सव यांचा आढावा घेणे.
४. सण व समारंभाची सद्यकालीन स्थिती अभ्यासणे.
५. महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवनातील सण व समारंभ धार्मिक जीवनाचा अविभाज्य घटक मांडणे.

विषयविवेचन:

महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवनातील सण व समारंभ समाजजीवनात बाराही महिने सण साजरे केले जात त्यापैकी सण प्रमुख चैत्र शुद्ध प्रतिपदेस गुढीपाडवा या नावाने ओळखले जाते. निसर्ग चक्रानुसार वसंत ऋतूचा आरंभ याच दिवशी होतो. कोणत्याही नवीन कार्यारंभास हा दिवस अत्यंत शुभ मानला जात होता. चौदा वर्षांच्या वनवासानंतर रामाने लंकेवर विजय मिळवून अयोध्येत प्रवेश केला अशी अख्यायिका समाजात रूढ झालेली होती. या दिवशी घरोघर गुढ्या व तोरणे उभारली जात असत या दिवशी ब्रम्हदेवाने जग निर्माण केले म्हणून ब्रम्हपुजा करण्याची प्रथा आहे. या दिवशी मंत्रउच्चारण करून कडुलिंबाची पाने, हिंग, लवंग, जिरे, बवा यासह खाल्ली असता आरोग्य, बल, बुद्धी व तेजस्विता प्राप्त होते अशी २० समजूत आहे. हिंदू परंपरोतील साडेतीन मुहूर्तापैकी गुढीपाडवा या सणाला महत्त्व समाजात होते. याच दिवशी चैत्रागौरीचे आगमन होवून तिच्या व्रताला प्रारंभ होतो अशी लोकश्रद्धा मानली जाते. या सणाप्रसंगी इतर जातीमधील लोक स्वतःचा सहभाग नोंदवीत असतो. उदा. ग्रामजोशी पंचांग सांगतो, पुजासाहित्य गुरव, चौगुला लिंब इ. वस्तु घेवून येत असत. त्याच्या मोबदल्यात त्यांना नैवेद्य अथवा दक्षिणा देण्याची प्रथा ही रूढ आहे. संपूर्ण भारतात चैत्रशुद्ध नवमी हा दिवस रामाचा जन्मदिवस म्हणून ' रामजन्मोत्सव' साजरा करण्याची प्रथा आहे. हा उत्सव आजही साजरा होतो. त्यावेळी खेड्यापाडयातही रामजन्मोत्सावेळी राममूर्ती पाळण्यात ठेवून गाणी म्हणणे, मंजरी वाटणे इत्यादी विधी महाराष्ट्रात केले जात होते. रामभजन, पूजन, उपवास वासारखे कार्यक्रम प्रत्येक गावात होतात. काही ठिकाणी गावच्या यात्रा भरतात. याशिवाय गुढीपाडवा ते रामनवमी या काळात रामायण ग्रंथाचे वाचन, रामकथेचे निवेदन, गीत रामायणाचे विविध कार्यक्रम करण्याची प्रथा समाजामध्ये प्रचलीत आहे. या दिवसाला हिंदू पंचांगानुसार चैत्र महिन्यातील नवरात्राचा नववा दिवस मानला जात असे. चैत्र शुद्ध पौर्णिमेला सूर्यादयाच्या काळात रामनवमीनंतर सहा दिवसांनी म्हणजे हनुमान जयंती साजरी केली जाते. ब्रम्हचर्य, बलोपासना, चारित्र्यसंबंध या गुणामुळे हनुमान जयंती उत्सव लोकजीवनात मान्यता पावलेला आहे. महाराष्ट्रात समर्थ रामदास स्वामींनी त्यांची उपासना करून आकरा मारूतींची स्थापना केली. त्याचा परिणाम समाजातील धार्मिक जीवनात झाला प्रत्येक गावात मारुतीची मंदिरे निर्माण झाली. त्याच ठिकाणी हा उत्सव साजरा करण्याची प्रथा निर्माण झाली. गुढीपाडव्याप्रमाणेच 'अक्षय्यतृतीया ' हा सण साडेतीन मुहूर्तापैकी महत्त्वाचा दिवस मानला जातो. वैशाख शुद्ध तृतीया या शुभदिनास अक्षय्य तृतीया या नावाने ओळखले जाते. या दिवसापासून चार युगापैकी कृत अथवा त्रेता युगाचा प्रारंभ झाला. अशी धार्मिक समजूत समाजात परंपरेनुसार पाळली जाते. या दिवशी विष्णू, शिव आणि पितर यांच्या प्रीत्यर्थ तृषाशमनासाठी जलकुंभ ब्राम्हणास देणे व श्राद्धाचा विधी पूर्ण केला जातो. महाराष्ट्रात हा सण ' आखाजी ' या नावाने प्रचलित आहे. तर काही भागात हा दिवस परशुरामजंयती म्हणून साजरा करण्याची प्रथा आहे. शेतकरी वर्ग या दिवसाच्या मुहूर्तावर पेरणी करतात. महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवनातील सण व समारंभ यामध्ये श्रावण शुद्ध पंचमीच्या दिवशी नागपंचमी हा सण साजरा करण्याची प्रथा आहे. कृष्णाने कालिया नागाचा शेवट केला तो दिवस असल्याची ही लोकसमजूत आहे. नागापासून मरणाची भिती अधिक असते. जर त्याची पूजा केली तर कोणत्याही प्रकारचे भय राहणार नाही अशी समाजाची कल्पना आहे. हा सण श्रीसंबंधाचा मानला जात होता. श्रीया नाग अथवा प्रतिमेची पूजा करीत असत या दिवशी जमीन खणणे, भाज्या चिरणे, शेत नांगरणे या कृती न करण्याची प्रथा आहे. नागपूजेनंतर विविध मनोरंजाचे खेळ खेळून आनंदोत्सव साजरा केला जातो. श्रावण महिन्यात अमावस्येला हा सण साजरा केला जातो. महाराष्ट्र व कर्नाटकात बैलाची पूजा मोठ्या उत्साहाने व भक्तीभावाने केली जाते. या सणाचे महत्त्व शेतकरी वर्गात मोठ्या प्रमाणात असते. या सणाचा मुख्य गाभा वर्षभर राबणाऱ्या बैल या प्राण्याविषयी २७ कृतज्ञता व्यक्त करणे. दक्षिण महाराष्ट्रात ' बेंदूर ' या नावाने हा सण प्रचलित आहे. या सणाकरिता कुंभार हा बलुतेदार मातीचे बैल परोघरी पोहच करित असतो. मांग तोरण बांधणे, माळी पूजेचे साहित्य, महारांनी धारकाव घालावी व मानकऱ्यास पोळया द्याव्यात अशी प्रथा समाजात आहे. गावातील सर्व बैलांची मिरवणूक काढली जाते. याप्रसंगी पाटलास विशेष मान गावात असतो. श्रावण महिन्यातील पौर्णिमता भाऊ-बहीण यांच्या प्रेमाचा मंगलमय सण संपूर्ण भारतात साजरा केला जातो. राष्ट्रीय एकात्मेचा आशय निर्माण करणारा हा सण आहे. पश्चिम किनारपट्टीवर हा सण नारळी पौर्णिमा या नावाने साजरा होतो. या दिवशी जलदेवतेला उद्देशून कोकणी, केरळी, मलवारी लोक समुद्राला नारळ अर्पण करत असतात. याशिवाय फारशी व मुसलीम समाजातही नारळ अर्पण करण्याची प्रथा प्रचलीत आहे. रक्षाबंधनाने सर्व अशुभाचा नाश होवून संपन्नता भरभराटीस येते असा समज लोकजीवनात आहे. समाजात निर्माण झालेल्या दृष्ट प्रवृत्तीपासून संकटापासून बहिणीचे भावने रक्षण करावे असा संकेत या सणाचा आहे. याच परंपरेत भाद्रपद शुद्ध चतुर्थीपासून चतुर्दशीपर्यंतच्या काळात विशेषत्वाने गणपतीची उपासना केली

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

जाते. प्रत्येक घरात गणेशमूर्तीची स्थापना करून पूजा-अर्चा करणे आणि दहा दिवसानंतर तिचे जलाशय अथवा नदीमध्ये विसर्जन करणे असे या सणांचे साधारण स्वरूप आहे. महाराष्ट्रात या काळात गणपतीसह गौरी किंवा महालक्ष्मी पूजन ही केले जात होते. पूर्वी गौरी गणपती या सणावेळी कुंभार हा बलुतेदार वर्ग प्रामुख्याने देशमुख, हकीम, देशपांडे, पाटील, चौगुले, मिरासदार, वतनदार या वर्गास मानाचा गणपती देत. या सणाप्रसंगी तेली, माळी, महार, कुंभारगावातील अधिक सेवा पुरवीत होते. माघ शुद्ध पंचमी म्हणजे ' वसंतपंचमीचा ' सण मानला जात असे. वद्य पक्षामध्ये वसंत ऋतुस सुरुवात होते. वसंतऋतूच्या आगमनाची ही पूर्वसूचना मानली जाते. वसंतपंचमीस रंग खेळण्याचीही प्रथा आहे.याचे उदाहरण मराठेकालीन दुसऱ्या बाजीराव पेशव्याच्या काळातील या सणाचे वर्णन मल्हारराव भोसले याने त्रिंबकजी डेंगळे याला पाठवलेल्या पत्रातून समजते. त्यामध्ये माघ शु॥ ६ शनिवार पावेतो साहेबाचे कृपावलोकणे करेण यथास्थित असो विशेषः काल वसंतपंचमीस विश्रामबागेत स्वारी श्रीमंत बाबासाहेब आले होते. केसरी रंग जाला होता. या दोन्ही पत्रावरून वसंतपंचमी स्थिती कशा प्रकारची होते हे स्पष्ट करणारे चित्र समजले जाते. महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवनातील सण व समारंभ यामध्ये दीपावली हा सण अश्विन वद्य १३ पासून कितीकी शुद्ध १२ पर्यंत हा उत्सव महाराष्ट्रात असतो. धनत्रयोशी, नरकचतुर्थी, लक्ष्मीपूजन, वहीपूजन, बलीप्रतिपदा, भाऊबीज हे दिवाळीमधील प्रमुख दिवस असतात. सबंध महाराष्ट्रात मोठ्या उत्साहाने हा सण साजरा करण्याची प्रथा आहे.. या सणातील दिपोत्सव मानवी जीवनामधील प्रकाशाचे सर्वोस्थान व्यक्त करते. या सणासंदर्भात चौदा वर्षाचा बनास संपल्यानंतर आयोध्येत परतलेल्या श्रीरामाच्या राज्याभिषेकाचा दिवस म्हणून, दिपमहोत्सव करून साजरा केला जातो अशी समाजाची समजूत आहे. दिवाळी हा सण सणांची महाराणी मानला जाणारा सण आहे. शिव व पेशवेकाळात या सणाला धार्मिक व सामाजिक प्रतिष्ठा होती. दिपमहोत्सावाची परंपरा व फटाके रोशनाई आकाश कंदील, अतिषबाजी यांची जोड हे सांस्कृतिक समन्वयाचे फलित मानले जात असे. या सणामधून धार्मिक आचाराबरोबरच सर्व जातीधर्माच्या लोकांना मान्य ठरतील असे सामाजिक आचारही समाज जीवनात आहेत. प्रत्येक जातीधर्मातील लोकांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या संबंध या सणाशी असतो. याच सणापासून पुढे सर्व नवीन व्यवहार आमलात आणण्याची प्रथा आहे. दिवाळीनंतरचा महत्त्वाचा सण मकरसंक्रांत मानला जातो. प्रतिवर्षी घडणाऱ्या नैसर्गिक घटनेवर आधारलेला हा सण आहे. सूर्याचे बारा राशीतून संक्रमण झाल्यानंतर तो मकर राशीत प्रवेश करतो. त्या दिवशी हा सण साजरा करण्याची परंपरा मानली जाते. या दिवसापासून सूर्याचे उत्तरायण सुरू होते. महाराष्ट्रातील मकर संक्रातीचा सण हा तीळ व गूळ यांना महत्त्व देणारा आहे. परस्परांमध्ये स्नेहमय वाढावा, संघर्ष संपावा, सर्वांनी एकजुटीने रहावे हा या सणापाठीमागील उद्देश आहे. विशेष मराठा काळात छत्रपती आगत्यपूर्वक आपल्या सरदारांना तिळगुळ पाठवीत व शुभेच्छा पत्रही देत पेशवेकालीन कागदपत्रात शर्करायुक्त तिळगुळ असा उल्लेख मिळतो. सुमारे तीन दिवस हा सण साजरा होत असे. पहिला दिवस भोगीचा, दुसरा संक्रांत,

थोडक्यात महाराष्ट्रातील सण समारंभ ही साजरी करण्याची प्रथा प्राचीन काळापासून भारतीय समाजामध्ये दिसून येते. आजही या प्रथा समाजाचा अविभाज्य घटक बनलेल्या आहेत. यावरून या सणांचे महत्त्व कळते वर्षानुवर्षे या सणाचे स्वरूप बदलत गेलेले दिसून येते. त्यामध्ये आधुनिकता आलेली आहे परंतु आधुनिकतेबरोबर पारंपारिकता सुद्धा या सणांमधून दिसून येते.

निष्कर्ष:

1. सण व उत्सवाच्या माध्यमातून ईश्वराशी सृष्टीशी, आप्तस्वकीयांशी, प्रेरित आणि विनायकांशी मूल्यात्मक नाते रुजविण्याचा प्रयत्न केला जातो.
2. समाजामध्ये बदलत्या निसर्गाच्या पार्श्वभूमीवर सण समारंभाची, पूजा विधीची मांडणी समाजातील धार्मिक जीवनात केली जाते.
3. धार्मिक जीवनात विधी, यात्रा, जत्रा, धार्मिक उत्सव ग्रामीण जीवनात उत्साह निर्माण करणारे घटक मानले जातात.
4. वर्षानुवर्षे या सणाचे स्वरूप बदलत गेलेले दिसून येते. त्यामध्ये आधुनिकता आलेली आहे परंतु आधुनिकतेबरोबर पारंपारिकता सुद्धा या सणांमधून दिसून येते.
5. महाराष्ट्रातील सण समारंभ ही साजरी करण्याची प्रथा प्राचीन काळापासून भारतीय समाजामध्ये दिसून येते. आजही या प्रथा समाजाचा अविभाज्य घटक बनलेल्या आहेत.
6. महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवनातील सण व समारंभ समाजजीवनात बाराही महिने सण साजरे केले जात आहेत.
7. महाराष्ट्रातील सांस्कृतिक धार्मिक जीवनात विधी, यात्रा, जत्रा, धार्मिक उत्सव ग्रामीण जीवनात उत्साह निर्माण करणारे घटक मानले जातात.
8. महाराष्ट्रातील सांस्कृतिक व धार्मिक ग्रामीण जीवनात ग्रामदेवता, कुलदेवता यांनाही महत्व आहे.
9. महाराष्ट्रातील सण समारंभ यामध्ये मुख्य उद्देश स्नेहमय वाढावा, संघर्ष संपावा, सर्वांनी एकजुटीने रहावे हा या सणापाठीमागील उद्देश आहे.
10. महाराष्ट्रातील शिव व पेशवेकाळात सण समारंभ यांना धार्मिक व सामाजिक प्रतिष्ठा होती.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

संदर्भ:

1. शेणोलीकर ह. श्री. व डॉ. देशपांडे प. न., 'महाराष्ट्राचा सामाजिक, सांस्कृतिक इतिहास ' , के सागर प्रकाशन, प्रथमावृत्ती २००६.
2. माटे म. श्री, ' मध्ययुगीन महाराष्ट्र सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन' (इ. स. 1300-1650), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती २००२.
3. जोशी . श. ना. (संपा) , 'मराठेकालीन समाज ' दर्शन अनाथ विद्यार्थी गृहप्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९६०.
4. डॉ . कुलकर्णी म. बा. व भवरे ना. गो., भारतातील धार्मिक विविधता घटक 3 नाशिक २००५
5. मराठी विश्वकोश ,महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ ,खंड क्र,.१०.
6. भावे वा. कृ ., पेशवेकालीन महाराष्ट्र, वरदा प्रकाशन ,पुणे प्रथमावृत्ती, १९५७.
7. दांडेकर वि.म व जगताप म. भा ,'महाराष्ट्राची ग्रामीण समाज रचना, गोखले अर्थशास्त्र संशोधन संस्था, पुणे प्रथमावृत्ती १९५७.